


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे अंक : ६४०. वा दि. ०३ जानेवारी २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# गृहमंत्र्यांच्या शहरातच महिला असुरक्षित...

## नागपुरात दोन वर्षांत बलात्काराच्या ५०० घटना...

वृत्तसंस्था/नागपूर

उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शहरात महिला सुरक्षित नसल्याचे उघड झाले आहे.नागपुरमध्ये गेल्या पाच वर्षांत तब्बल १ हजार ९३ बलात्काराच्या घटनांची नोंद झाली आहे. गेल्या दोन वर्षांत बलात्काराच्या ५०० हुन अधिक गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून नागपुरातील महिला सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.बलात्काराला बळी पडलेल्यांमध्ये अल्पवयीन मुली,तरुणी आणि विवाहित महिलांचा समावेश आहे.गेल्या वर्षी सर्वाधिक २५२ महिलांवर बलात्कार झाल्याची नोंद पोलिस विभागाने केली आहे.बलात्काराच्या घटनांसह अश्लील चाळे,शेरेबाजी,लज्जास्पद वर्तन आणि विनयभंगाच्या घटनांमध्येही मोठी वाढ झाली आहे.२०१९ मध्ये १८३ महिला-तरुणींवर बलात्कार झाल्याचे गुन्हा दाखल झाले. तर पाच वर्षांत या गुह्यांत ३१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. महाराष्ट्राच्या उपराजधानीत बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होऊनही पोलीस विभागाकडून कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचेच चित्र आहे. पोलिसांकडून दोषींना शिक्षा होण्याच्या गांभीर्याने तपास केला जात नसल्याचे दिसून येत आहे. तपासात अनेक त्रुटी असतात. त्याचा लाभ आरोपींना मिळतो. अनेकदा खटले प्रलंबित राहत असल्याने आणि गंभीर स्वरूपाचा गुन्हा असतानाही आरोपींवर वचक राहत नाही. बलात्काराच्या घटनांमध्ये पोलीस अधिकारीच नकारात्मक भूमिका घेतात. तक्रार महिलांना पोलीस ठाण्यात योग्य वागणूक मिळत नाही. त्याचा विपरीत परिणाम गुन्हे दाखल होण्यावर पडत असल्याचे समोर आले आहे. अनेक महिलांच्या तक्रारींनुसार गुन्हा दाखल होत नाही. राज्य महिला आयोग किंवा वरिष्ठांनी दखल घेतल्यानंतर गुन्हे दाखल करण्यास गांभीर्य दाखवण्यात येत असल्याचे चित्र



अनेकदा असते. भाजपची बेटी बचाओ, बेटी पढाओची घोषणा हे ढोंग आहे. ही बलात्कारी जनता पार्टी झाली आहे, अशी टीका काँग्रेसच्या महिला मोर्चाच्या अध्यक्षा नेत्या डिसुझा यांनी वाराणसीतील सामूहिक बलात्काराच्या घटनेवरून केली. मध्य प्रदेशात भाजपाचा प्रचार करत असल्यामुळेच ६० दिवस आरोपींना अटक केली नाही, असा आरोप त्यांनी केला.




## खामगावात गुरे चोरट्यांनी घातला धुमाकूळ...



जनसंचलन/खामगाव

शहरात गायी चोरणार्यांची संख्या वाढली आहे. दररोज जनावरे चोरीला जात आहेत. गोपाळ नगर भागातून आठवड्यातून दोन ते तीन गायी चोरीला जात असल्याने पशुपालक त्रस्त झाले आहेत. पोलिसांनी गायी चोरट्यांना पकडण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे. यापूर्वी शहरातून कारच्या डिक्कीमध्ये गायीचे वासरू टाकून चोरण्याच्या घटना घडल्या आहेत. शहरात अनेक जनावरे रस्त्यावर फिरत असतात. पशुपालक जनावरांना मोकाट सोडून देतात. एखाद्या सुनसान जाग्यावरून चोरटे जनावरे चोरत असल्याच्या घटना घडत आहेत. तसेच रात्रीच्या सुमारास जनावरे चोरीस जात आहेत. गोपाळ नगर भागातील अनेक जना-वरे चोरीला गेले आहेत. आतापर्यंत पोलिस प्रशासनाने कारवाई केली नाही. त्यामुळे पशुपालकांमध्ये नार-ाजीचा सूर उमटत आहे. गाय चोरट्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा सिड हब बनण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील भाजीपाला बिजोत्पादन कंपनी, शेतकरी उत्पादक कंपनी आणि शेतकरी उत्पादक गटांनी देशात बुलढाणा जिल्ह्याची ओळख सिड हब होण्यासाठी एकत्रित येऊन बिजोत्पादनाचे जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हा नियोजन समिती सभागृहामध्ये भाजीपाला बिजोत्पादन वाढवणे, बिजोत्पादन करताना येणाऱ्या अडचणी आणि उपाययोजनांसंदर्भात सिड हब अनुषंगिक बाबी व क्षेत्र विस्तारासाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी भाजीपाला बिजोत्पादन कंपन्यांना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेत त्यावर विविध उपाययोजना सूचविल्या. सद्यस्थितीत जिल्ह्यातील देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, लोणार व चिखली या चारच तालुक्यात भाजीपाला बिजोत्पादन होते. जिल्ह्यामध्ये भाजीपाला बिजोत्पादन केंद्र उभारणीसाठी कंपनी व शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक गटांनी योग्य समन्वय ठेवत क्षेत्र जास्तीत जास्त विस्तारण्यासाठी यावे. त्यासाठी कंपन्यांना सिंचनाची सोय आवश्यक असल्यास मागेल त्याला शेततळे योजनेंतून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेततळ्यांचा लाभ घ्यावा. तसेच मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनेंतर्गत सौर कृषि पंपाकरिता ९५ टक्के अनुदान आहे. शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक गटांनी समूह पद्धतीने भाजीपाला बिजोत्पादन करण्याबाबत करार करून घ्यावेत. तसे केल्यास दोघांनाही फायदा होईल. भाजीपाला बिजोत्पादन कंपनींतर्गत काम करणारे कर्मचारी, मजूर व त्यांच्या कुटुंबाला आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री सुरक्षा विमा, ई-श्रम योजना, जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घेण्याबाबत प्रोत्साहीत करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




या बैठकीला जिल्ह्यातील कृषि विकास अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी व सर्व भाजीपाला बिजोत्पादन कंपनी प्रतिनिधी व शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# वृद्धाश्रमातील वृद्धासोबत वाढदिवस साजरा करीत केली आर्थिक मदत




**जनसंचलन/ चिखली**

ना डिजे ना रिकामा पैसेअंत्री कोळी येथील प्रतिष्टीत सामाजिक युवा नेते समाधान हिवाळे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत तुकाराम आश्रय वृद्धाश्रमातील बेवारस निराधार बेघर वृद्धासोबत आपला वाढदिवस साजरा केला. भोकर येथे तुकाराम आश्रय वृद्धाश्रम च्या माध्यमातून गेल्या एक वर्षापासून बेवारस निराधार बेघर असे वयोवृद्ध आजिआजोबांची निःस्वार्थ पणे मोफत सेवा देणे सुरु आहे. त्या वृद्धाच्या हस्ते औक्षण करून आशीर्वाद घेतला आपला वाढदिवस साजरा करून वृद्धाश्रमाच्या बांधकाम साठी पाच हजार रुपये आर्थिक मदत करून आजच्या युवा पिढी समोर एक आदर्श निर्माण केला आहे. यावेळी कार्यक्रम चे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते अजीज जमादार हे होते तर प्रमुख उपस्थितीत पत्रकार महेंद्र हिवाळे, सवणा चे उपसरपंच कय्युम शाह, सै मोसिन सर, अजय हीवाळे, अमोल हीवाळे, सिद्धार्थ हिवाळे, सदीप इंगळे हे होते. तुकाराम आश्रय वृद्धाश्रम चे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांनी त्यांचे आभार व्यक्त करीत सूत्रसंचालन केले तर आभार सौं रुपाली डोंगरदिवे यांनी केले.

# चिखली तालुका पत्रकार संघातर्फे ६ जानेवारीला साजरा होणार दर्पण दिन...

## पत्रकार संजय मोहिते, कैलास गाडेकर व छोटू कांबळे यांना पुरस्कार जाहीर...


**जनसंचलन / चिखली**

दरवर्षी ६ जानेवारी रोजी साजरा होणारा दर्पण दिन यावर्षी देखील चिखली तालुका पत्रकार संघाच्या वतीने साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन पंचायत समितीच्या सभागृहात सकाळी ११ वाजता करण्यात आले असून सदर कार्यक्रमात पत्रकारितेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पत्रकारांना सन्मानित केले जाणार आहे. यामध्ये पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कारासाठी बुलढाणा येथील जेष्ठ पत्रकार संजय मोहिते, शोध पत्रकारितेसाठी पुण्यनगरीचे चिखली येथील प्रतिनिधी कैलास गाडेकर व नवोदित पत्रकारांसाठी नवपत्रकारिता पुरस्कारासाठी आम्ही चिखलीकर दैनिकाचे संपादक छोटू कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.

चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमास आ. श्वेताताई महाले, विद्याधरजी महाले ,माजी आमदार राहुल बोंद्रे, माजी आमदार रेखाताई खेडेकर , शिवसेना संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर , तहसीलदार सुरेश कव्हळे, ठाणेदार संग्रामसिंह पाटील, नगरपालिका मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे , जेष्ठ नेते रामदासभाऊ देव्हडे, सामाजिक कार्यकर्ते नंदु पालवे, अमित वाधवानी, हाजी दादू सेठ , प्रा. निलेश गावंडे , सचिन बोंद्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात पत्रकारिता पुरस्कारांचे देखील वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. तरी या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन चिखली तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष कमलाकर खेडेकर, सचिव तौफिक अहमद, सहसचिव इमरान शहा, संघटक नितीन फुलझाडे, कोषाध्यक्ष छोटू कांबळे यांनी केले आहे.

सोलापूर येथून टेक्सटाईल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केलेल्या संजय मोहिते यांनी आपल्या पत्रकारितेचा प्रारंभ १९९२ मध्ये लोकसत्ता व इंडियन एक्सप्रेस या मराठी व इंग्रजी दैनिकांपासून केला. त्यानंतर लोकमत बुलढाणा उप संपादक व वाशीम जिल्हा प्रतिनिधी नंतर तिथेच मातृभूमी वाशीम जिल्हा प्रतिनिधी म्हणून जबाबदाऱ्या पार पाडल्या. पुढे बुलढाणा येथे पुण्यनगरी उप संपादक व बुलडाणा लाईव्ह विशेष प्रतिनिधी म्हणून कार्य केले. सध्या ते लोकसत्ता दैनिकाचे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. ते राजकारण, ग्रामपंचायत व लोकसभा निवडणूकांचे गाढे अभ्यासक असून समाजकारण, प्रशासकीय, मानवीय मूल्य असलेल्या बातम्या, शोध पत्रकारिता यावर मोहिते यांचा विशेष भर असतो. आजवर पत्रकारिता क्षेत्रामध्ये विशेष कामगिरी बद्दल १० विविध संस्था व संघटनांचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले असून संजय मोहिते यांचे काश्मीर समस्यांवरील पुस्तक प्रकाशित झाले असून अनेक नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करून त्यांनी घडवले आहे.

कैलास गाडेकर यांनी बी. ए. ची पदवी प्राप्त केल्यानंतर सन १९९९ मध्ये अकोला येथून प्रकाशित होणाऱ्या दैनिक नवयुगवाणी या दैनिकापासून आपल्या पत्रकारितेची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील मापदंड या दैनिकासाठी वार्तांकन सुरू केले. पुढे अकोल्यातीलच मातृभूमी दैनिकाचे शहर प्रतिनिधी म्हणून ते रुजू झाले. २००५ मध्ये सकाळ दैनिकासाठी आणि पुढे त्यानंतर २००७ मध्ये पुण्यनगरीचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी कार्य सुरू केले, जे आजपर्यंत सुरूच आहे. यादरम्यान त्यांची चिखली तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी देखील सर्वानुमते निवड करण्यात



संजय मोहिते | कैलास गाडेकर | छोटू कांबळे

आली. शोध पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये त्यांनी ग्रामीण आणि शहरी भागातल्या समस्यांनी वाचा फोडणाऱ्या व प्रशासनातील अनेक त्रुटी उजागर करणाऱ्या शोध बातम्या प्रकाशित केल्या आहेत.

छोटू कांबळे यांच्या पत्रकारितेची सुरुवात मुंबई येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक सम्राट शासन या वृत्तपत्रातून २०१३ साली झाली. इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण झालेल्या छोटू कांबळे यांनी त्यानंतर सीसीएन न्यूज, विदर्भ दर्पण प्रतिनिधी म्हणून काही महिने काम केले. २०१६ मध्ये वयाच्या केवळ १९ व्या वर्षी साप्ताहिक एक नजर या साप्ताहिकाची सुरुवात केली. एवढ्या लहान वयात संपादक म्हणून भूमिका निभावणारे कदाचित ते जिल्ह्यातील एकमेव पत्रकार ठरावेत. पुढे सन २०१८ पासून दैनिक आम्ही चिखलीकर नावाचं दैनिक कांबळे यांनी सुरू केले. त्यांना छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी राज्यस्तरीय दलित मित्र पत्रकार पुरस्कार, मेहकर येथे जिल्हास्तरीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकनायक पुरस्कार, साखरखेर्डा येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता जिल्हास्तरीय पुरस्कार तर सामाजिक कार्याबद्दल समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जनकल्याण समाज उन्नती पत्रकार संघटनेची नूतन कार्यकारणी जाहीर.

## बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी विजय जयस्वाल यांची नियुक्ती

जनसंचलन / चिखली

तालुक्यातील शहर व ग्रामीण भागातील छोट्या मोठ्या पत्रकारांची एकजुट व्हावी छोट्या मोठ्या पत्रकारांना निर्भयपणे लिखाण स्वतंत्र प्रदान व्हावे व जनसामान्य पत्रकारांची गळचेपी होऊ नये तसेच ग्रामीण पत्रकारांचे भव्य संघटन उभारण्यात यावी या मुद्द्यावर साधक वादक चर्चा झाली. प्रत्येक पत्रकारास शासनाने समसमान धोरणाप्रमाणे वर्तणूक द्यावी तसेच समाज जीवनातील विविध प्रश्नासाठी सदर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तन मन धनाने झटावे असे सर्वानुमते ठरवण्यात आले यावेळी जनकल्याण समाज उन्नती पत्रकार संघटनेची नूतन कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली सदर कार्यकारणी ही संस्थापक अध्यक्ष विनोद पवार यांच्या उपस्थितीमध्ये जाहीर करण्यात आली तसेच जनकल्याण समाज उन्नती पत्रकार संघटनेच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी म्हणून विजय जयस्वाल यांची निवड करण्यात आली तसेच चिखली तालुका कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली जनकल्याण समाज उन्नती पत्रकार



संघटनेच्या चिखली तालुका कार्यकारणी मध्ये सर्वानुमते शेख कदीर शेख शब्बीर चिखली तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.तसेच यामध्ये चिखली तालुका उपाध्यक्षपदी निलेश कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली व तालुका कार्याध्यक्ष हरीसिंग छर्रे, तालुका सचिव मंगेश भोलवनकर तालुका सहसचिव राजेश बिडवे, तालुका कोषाध्यक्ष शेख सरदार भाई तर सदस्य म्हणून असलम हिरेवाले, उस्मान चौधरी, दिलीप हतागळे, राधेश्याम काळे, किरण शैजोळ, सागर जाधव,शाहबाज शे.,रेहान शे.,मो.कैफ,सोपान परिहार यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली.

# चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक करा

## शिवसेना उबाठा महिला आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

जनसंचलन / बुलढाणा

जिल्ह्यात होणारे बाल लैंगिक अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असून त्यावर उचित कार्यवाही होत नसल्याचे दिसून येत आहे. अशाच एक प्रकार पातुर्डा जवळील कोद्री या गावातील चिमुकलीवर अत्याचार करणारा अजूनही त्याच्यावर कोणतीच कारवाई झाली असल्याने तो मोकाट फिरत असून पोलिसांनी त्याला जेरबंद करावे, अशा मागणीचे निवेदन शिवसेना उबाठा महिला आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षकांना देण्यात आले. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, भारत सरकार महिला बालविकास मंत्रालय नवी दिल्ली अंतर्गत चाइल्ड लाइन इंडिया फाउंडेशन, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली बुलडाणा जिल्ह्यात १४ सप्टेंबर २०१२ पासून चाइल्ड लाइन १०९८ हा प्रकल्प भारतीय बहुउद्देशीय लोक शिक्षण संस्था, बुलडाणा अंतर्गत राबवला जात होता. त्यामध्ये संस्थेअंतर्गत बुलडाणा चाइल्ड लाइन प्रकल्पाच्या माध्यमातून गेल्या ११ वर्षांत काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या विविध बालकांच्या समस्यांवर काम करुन अनेक बालकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. त्यानुषंगाने आज रोजी बुलडाणा जिल्ह्यात वृत्तपत्रातून प्रकाशित होणाऱ्या बाल लैंगिक छळाचे प्रकार हे मन हादरून टाकणारे आहे. सदर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणात बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासन यंत्रणा सज्ज नसल्याचे दिसून येत आहे.

संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा जवळ कोन्द्री या गावात एक ८ वर्षीय चिमुकलीचा शाळेतील ५४ वर्षीय शिक्षकाकडून विनयभंग झाल्याची घटना समोर आली आहे. बालिकेचा विनयभंग होऊन २० दिवस झाले असताना सुद्धा सबंधित पोलिस स्टेशनकडून आरोपीला अटक करून शिक्षा देण्याची



कुठलीही कार्यवाही न झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बालिकेला न्याय मिळवून द्यावा, अशा घटनांना प्रतिबंध घालणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे योग्य ती कार्यवाही करून बाल लैंगिक अत्याचारावर थांबवावेत. चिमुकलीच्या विनयभंगाच्या घटनेची चौकशी करून, घटनेचा घटना अहवाल मागवावा बालिकेला बाल कल्याण समिती, बुलडाणा यांच्या समक्ष हजर करून आरोपीला अटक करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी जिजा राठोड, पद्मा परदेशी, वैशाली कोलते यांनी केली आहे.

# गरिबांच्या दुकानांवर बुलडोझर तर वरली मटक्यांच्या दुकानांना अभय का..?

## अवैध धंदे व बिहार राज बंद करण्यासाठी आझाद हिंदचा अल्टिमेट.

जनसंचलन /बुलढाणा

अवैध धंद्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचे तिनं तेरा वाजले आहेत. अवैध व्यवसायिकाकडून हप्ते मिळत असल्यामुळे शासन प्रशासनाकडून वरली मटक्यावाल्यांना व त्यांच्या दुकानांच्या जागेला अभय दिल्या जात आहे. गरिबांच्या अतिक्रमित हातगाड्या, छोटी दुकाने उठवल्या जात असतांना वरली मटका वाल्यांना शासन प्रशासनाच्या जागेत दुकाने थाटण्याची परवानगी कशी आहे..? मग ते शासन प्रशासनाचे जावई लागतात का..? हे प्रथम जिल्हा प्रशासनाने जाहीर करावे.अन्यथा आझाद हिंद च्या वतीने जन आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा आझाद हिंद संघटनेच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष अँड सतीशचंद्र रोठे यांनी दिला आहे. एक जानेवारीला जिल्हाधिकारी बुलढाणा व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यात लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांवर होणारे प्राण घातक हल्ले,नाबालिक मुली,महिला गहाळ होणे,अपहरण,अन्याय,



अत्याचार ,बलात्काराच्या वाढत्या घटना, रोड रॉबरी, चोरी, दरोडा, दागिने लुटणे, फसवणूक यासह चोर सोडून संन्यासाला फाशी देण्याच्या घटनां दैनंदिन घडत आहेत. त्यामुळे वाढणारा क्राईम रेट जिल्ह्याची प्रतिमा बिहाराजची झाली आहे. यासाठी मागील तीन वर्षात आझाद हिंद सह जिल्ह्यातील सर्व पक्षीय, सामाजिक संघटनांच्या वतीने सातत्याने विविध आंदोलनांच्या माध्यमातून आवाज उठविला आहे. तरी जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणातील मागणीकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. स्वयंकेंद्रित स्वार्थासाठी जिल्हा प्रशासन गरीबांच्या परिवाराची राखरांगोळी होतांना उघड्या डोळ्याने पाहत आहे. तरी जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था निर्माण करावी. अन्यथा आझाद हिंद च्यावतीने जन आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा निवेदनाअंती देण्यात आला आहे. निवेदनावर अँड.सतीशचंद्र रोठे,शेख सईद, संजय एंडोले,असलम शाह, सय्यद युसुफ,आदित्य गवई,शेख शब्बीर, सुरेखाताई निकाळजे, वर्षाताई ताथरकर, आशाताई गायकवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शासकीय मदत थांबवली असल्यास लेखी तक्रार करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन /बुलडाणा

यंदा जिल्ह्यात शासनाने दुष्काळ घोषित केल्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना शासकीय लाभापासून वंचित ठेवू नये, असे आदेश जिल्हा प्रशासनाने सर्व बँकांना दिले आहेत. तरीही बँकांकडून असे होत असल्यास (होल्ड लागला असेल) शेतकऱ्यांनी यासंदर्भात संबंधित तहसील आणि अग्रणी बँकेकडे लेखी तक्रार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. यावर्षी शासनाने दुष्काळ घोषित केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणतीही बँक कृषी कर्जाची सक्तीची वसुली करणार नाही. खरीप हंगामामध्ये पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करता येणार असून, पीक कर्ज घेताना बँकांनी सीबील स्कोरची अट लावू नये. त्यामुळे शेतकरी स्वेच्छेने नवीन कर्ज घेऊ शकतील, असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ही सर्व पात्र नागरिकांना अनिवार्य असून खातेधारकांनी त्यासंबंधी बँकेकडे चौकशी



करावी. तसेच व्यवसायासाठी कर्जाची आवश्यकता असल्यास प्रधान मंत्री मायक्रो फूड प्रोसेसींग इंटरप्रायजेस (पीएमएफएमइ) किंवा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजनेमध्ये अर्ज करावा व त्यासंदर्भात चौकशीसाठी पीएमएफएमइबाबत तालुका कृषी अधिकारी आणि सीएमईजीपीसाठी जिल्हा उद्यो ग केंद्रांशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. तसेच सर्व शेतकऱ्यांनी आपले आधार बँक खात्याशी लिंक करुन घ्यावे व वारंवार आपली बँक तसेच मोबाइल नंबर बदलू नये, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पालीवाल पिता पुत्र यांना एकाचवेळी पत्रकारिता पुरस्कार...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

येथील ज्येष्ठ पत्रकार व साथीदारचे संपादक अनिलकुमार द्वा. पालीवाल यांना जागतिक संविधान व संसदीय असो. तर्फे पत्रकारितेतील पन्नास वर्षे अविरत सेवाकार्य तसेच सामाजिक सेवेत उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन संस्थेच्या वरिष्ठ सदस्या प्राचार्य डॉ. सुवर्णा बोडके व मान्यवरांच्या हस्ते स्मृती चिन्ह, गौरवपत्र, संस्थेचे मानद सदस्य पत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.अध्यक्षस्थानी महाराष्ट्र संपादक परिषदेचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे होते. तसेच महाराष्ट्र टाइम्स नाशिकचे वरिष्ठ उपसंपादक गोपाल अनिलकुमार पालीवाल यांना त्यांच्या पत्रकारितेतील दशकपूर्ती सेवेप्रित्यर्थ नाशिक पत्रकार संघाचा कार्यगौरव पुरस्कार घोषित झाला असून येत्या सहा जानेवारी पत्रकार दिनी माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार हेमंत गोडसे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. श्री पालीवाल परिवाराची चौथी पिढी




सध्या पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, समाजसेवा क्षेत्रात स्व. द्वारकादासजी पालीवाल प्रतिष्ठानतर्फे कोणतीही प्रसिद्धी न करता अनेक उपक्रम राबविण्यात येतात. पालीवाल पिता पुत्राच्या या यशाबद्दल महाराष्ट्र पालीवाल परिषद, पालीवाल समाज, लासूर, चोपडा, ज्येष्ठ नागरिक संघ, चोपडा, फेस्कॉम संघटना, नाटेश्वर पत्रकार संघ, लासूर आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे

# मनोज जरांगे एकनाथ शिंदे यांच्यात बैठक...

## मराठा आरक्षणासाठी जरांगे आक्रमक कुणबी नोंदींच्या तपासणीच्या कामावर नाराजी...

**वृत्तसंस्था/ जालना**

मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उच्चस्तरीय बैठक बोलावली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गिरीश महाजन यांच्यासह इतर मंत्री उपस्थित होते. या बैठकीत मनोज जरांगे जालना येथून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. मनोज जरांगे यांनी यावेळी आंतरवाली सराटीतील गुन्हे मागे घेण्यात आले नाहीत, असं म्हटलं आहे. सरकारच्या वतीनं उपोषण सोडताना उदय सामंत, अतुल सावे, बच्चू कडू, धनंजय मुंडे, संदिपान भुमरे यांच्यासह न्यायमूर्ती गायकवाड, न्यायमूर्ती सुक्रे हे उपस्थित होते. त्यावेळी सरकारचा शब्द अंतिम मानून उपोषण सोडलं होतं. त्यावेळी ज्याची नोंद सापडेल त्याच्या परिवाराला जात प्रमाणपत्र देण्याचा मुद्दा ठरला होता. १८०५ ते १९६७ आणि १९६७ ते २०२३ पर्यंतच्या नोंदी तपासण्याचं ठरलेलं होतं. ज्याची नोंद ठरलेली त्याच्या सगळ्या परिवाराला जात प्रमाणपत्र देण्याचा मुद्दा घेण्यात आला होता.ज्याची नोंद सापडली त्याचे सगेसोयरे असं ठरलं होतं. सगेसोयरे या शब्दाचा अर्थ चुकीचा लावला गेला, असं मनोज जरांगे म्हणाले.मनोज जरांगे यांनी राज्यातील काही तालुक्यांमध्ये कुणबी नोंदी तपासणीचं काम योग्यरित्या होत नसल्याची तक्रार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. बीड, नांदेड, जालना, हिंगोली परभणी जिल्ह्यात कुणबी नोंदी व्यवस्थित झाल्या नसल्याची तक्रार मनोज जरांगे यांनी केली.राज्य सरकारनं समिती नेमली पण खालचे अधिकारी दाखले देत नाहीत, अशी तक्रार मनोज जरांगे यांनी



केली. काही ठिकाणी निरंक अहवाल दिले गेल्याची तक्रार देखील जरांगेंनी केली. आमच्यावर अन्याय कुणाच्या सांगण्यावरुन सुरु आहे, असा सवाल जरांगेंनी केला. विविध गावांमधील रेकॉर्ड तपासलं जाणार नसेल तर न्याय कसा मिळणार असा सवाल जरांगे यांनी केला.आंतरवाली सराटीमध्ये आमच्या लोकांनी मार खाल्ला पण त्यांच्यावरच गुन्हे दाखल करण्यात आले. दोन दिवसांमध्ये गुन्हे मागे घेतो असं सांगितलं होतं मात्र सरकारच्यावतीनं चार महिने झाले तरी गुन्हे मागे घेतले गेले नाहीत, असा मुद्दा देखील जरांगे यांनी माडंला.

# राजू शेट्टी आणि उद्धव ठाकरेंची यांची अदानी विरोधात भेट...

**वृत्तसंस्था/मुंबई**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी लोकसभा निवडणुकीला सहा जागांवर उमेदवार देणार असल्याचं जाहीर केलं होतं. राजू शेट्टी यांनी कोल्हापूर, हातकणंगले, सांगली, माढा, परभणी आणि बुलढाणा मतदारसंघातून स्वाभिमानी उमेदवार देणार असल्याचं म्हटलं होतं. राजू शेट्टी आज मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी दाखल झाले होते. आज मी उद्धव ठाकरे यांना भेटलो ते राजकीय हेतूनं भेटलेलो नाही. मी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात भेटलो होतो. ठाकरे यांची अदानी उद्योगसमुहाच्या विरोधात लढाई सुरु आहे. अदानींचा आम्हा शेतकऱ्यांना देखील त्रास होत आहे, असं राजू शेट्टी म्हणाले. केंद्रानं अदानींच्या प्रेमापोटी आयात होणाऱ्या खाद्यतेलावरील पाच टक्के आयात शुल्क कमी केल्यामुळं सोयाबीनला भाव नाही. २००० साली असणारा सोयाबीनचा भाव चार हजार रुपये आणि २४ वर्षानंतर आहे तेवढाच टिकून आहे, याचं कारण मोठ्या प्रमाणावर कच्चं तेल बाहेरच्या देशातून आयात झालं. त्यावरील आयात शुल्क २०२५ पर्यंत कमी केलं आहे, त्यामुळं सोयाबीनच्या दरावर परिणाम झाला आहे, असं राजू शेट्टी म्हणाले.येत्या १५ जानेवारीपासून सोयाबीन आणि कर्जमाफीच्या मुद्यावर मराठवाड्यात दौरा सुरु करणार आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाची अदानीविरुद्धची लढाई आहे ती शेतकऱ्यांची देखील लढाई आहे. कारण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. कोल्हापूरमधील वेदगंगा नदीवरील पाटगाव येथील धरणाचं पाणी आहे, त्या धरणाचं पाणी अदानी उद्योगसमूह ८४०० कोटी खर्च करुन सिंधुदुर्गाला नेऊन २१०० मेगावॅटची वीज निर्मिती करणार आहे. त्यामुळं कोल्हापूर आणि सीमाभागातील शेतकऱ्यांना पाणी कमी पडणार आहे. याविरोधात आम्ही लढा लढणार आहोत. यासाठी आम्ही संघर्ष समिती उभी करणार आहे. यामध्ये कोल्हापूर आणि सिंधुदुर्गमधील शेतकऱ्यांचा लढा उभा करणार आहोत, असं राजू शेट्टी म्हणा-



ले. शेतकऱ्यांच्या लढ्याला शिवसेनेचा पाठिंबा मिळावा म्हणून उद्धव ठाकरेंची भेट घेतली. शेतकऱ्यांच्या लढ्यात पाठिंबा देऊ असं राजू शेट्टी म्हणाले. शहरासह गाव खेड्यातील लोकांनी एकत्र येत या प्रश्नावर लढायचं आहे, असं राजू शेट्टी म्हणाले.महाविकास आघाडीत जायचा विचार आमचा नाही. आम्ही स्वतंत्रपणे लढणार आहोत. आम्ही जनतेच्या प्रश्नावर आंदोलन करतोय, त्यासाठी शिवसेनेचा पाठिंबा हवा आहे, त्यासाठी ठाकरेंना भेटलो, असं राजू शेट्टी म्हणाले. मविआनं एफआरपी आणि भूमिअधिग्रहण कायद्यातील बदल या मुद्यावर आम्ही मविआ सोडली आहे, असं राजू शेट्टी यांनी म्हटलं. शेतकऱ्यांच्या प्रश्नावेळी मविआतील नेते कारखानदारांच्या बाजूनं झुकतात, असं राजू शेट्टी म्हणाले.

# शेतकऱ्यांच्या आंदोलनाला वन बुलढाणा मिशनचा पाठिंबा संदीप शेळकेंचा ट्रॅक्टर मोर्चात सहभाग...

**जनसंचलन/ खामगाव**

जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील बोरी आडगाव येथील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी १ जानेवारी रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर काढलेल्या ट्रॅक्टर मोर्चाला वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी पाठिंबा देत सहभाग घेतला. गेल्या पाच दिवसांपासून बोरी आडगाव येथील सात शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी उपोषण सुरु केले आहे. मात्र या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आज सहाव्या दिवशी खामगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढला. सर्व पिक विम्याची रक्कम खात्यात जमा करा, खामगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा, सरसकट कर्जमाफी करा आदी मागण्यांसाठी शेतकरी शाम कीर्तने, वासुदेव बोहरूपी, किशोर तायडे, विठ्ठल ठाकरे, गजानन नाईक, विठ्ठल घोगे, मुरलीधर ठाकरे यांनी उपोषण सुरु केले असून सोमवारी ट्रॅक्टर मोर्चा काढला. शेतकऱ्यांचा आवाज दाबता येणार नाही



लोकशाही मार्गाने निघालेला ट्रॅक्टर मोर्चा पोलिसांनी अडवला. ही कुठली पद्धत आहे..? बळाचा वापर करुन शेतकऱ्यांचा आवाज दाबता येणार नाही. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी जगला पाहिजे याकरिता शासनाने त्यांना पाठबळ द्यावे. शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असून त्या मान्य झाल्याच पाहिजे, अशी भूमिका संदीप शेळके यांनी मांडली. आपल्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. कृषिप्रधान देश म्हणून आपली जगात ओळख आहे. असे असतांना आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी शेतकऱ्यांना उपोषण करावे लागते. मोर्चा काढावा लागतो. खरं म्हणजे हे दुर्दैव आहे. वन बुलढाणा मिशन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे संदीप शेळके म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — ===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क ===== संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| Size | Rates | Hight | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/- 15 Day=3500/- 7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Rate | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com